जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 APR 2026

वर्तमान

# जनसंपर्कात सत्य आणि नैतिकता महत्वाची : माहिती उपसंचालक प्रवीण टाके

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
'कोरोना साथीनंतर जनसंपर्क क्षेत्र अधिक महत्वाचे झाले आहे पण विश्वासार्हता टिकवणे हेही आवश्यक झाले आहे. तसेच एआय टूलच्या वापरामुळे कामास गती मिळते मात्र आपत्कालीन स्थितीतही सत्य आणि नैतिकता जपणे आवश्यक आहे, असे मत विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी 'पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे' अधिकृत उदघाटन झाल्याचे प्रवीण टाके यांनी जाहीर केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) च्या कोल्हापूर चॅप्टर उद्घघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ.रवींद्र चिंचोलकर, कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष प्रा.डॉ. निशा मुडे-पवार, सचिव विश्वजीत भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.रवींद्र चिंचोलकर म्हणाले, 'जनसंपर्क आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक बनले आहे. जनसंपर्क व माध्यमातील सर्वांनाच प्रॉम्प्ट ट्रेनिंग आवश्यक आहे. एआयचा वापर शिकल्यास नोकऱ्यांची संधी उपलब्ध असेल. पीआरएसआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रात कामाची संधी मिळू शकते.' अंकुश चव्हाण म्हणाले, 'आपत्कालीन स्थितीत पहिले काही तास 'गोल्डन अवर' म्हणून महत्वाचे असतात. यंत्रणेने नेमके काय चुकले ते शोधून दुरुस्ती करणे गरजेचे असते. घटना घडल्यानंतर माध्यमांना तत्काळ योग्य माहिती दिल्यास नंतर खुलासा करण्याची गरज पडत नाही.'

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे माजी विद्यार्थी व भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी वारणा कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, माझगाव डॉकचे माध्यम सल्लागार पी.एस.पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, आकाशवाणी पुणे वृत्त विभागाचे माधव जायभाई, कोल्हापूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र पारिजात, जेष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या डॉ.वृषाली बर्गे, कणेरी मठाचे जनसंपर्क



अधिकारी विवेक सिद्ध, तुतारी जाहिरात संस्थेचे संचालक सचिन मोरे, सरदार जाधव, विवेक पोर्लेकर, टिटवे कॉलेजचे दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, डायमंड हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सुनील भस्मे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनुराधा ईनामदार व डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी केले. कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य, जनसंपर्क, जाहिरात, विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत व्यक्ती तसेच माध्यम क्षेत्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टर आणि पत्रकारिता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

2 3 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनसंपर्कात सत्य आणि नैतिकता महत्वाची : प्रवीण टाके

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

'कोरोना साथीनंतर जनसंपर्क क्षेत्र अधिक महत्वाचे झाले आहे पण विश्वासार्हता टिकवणे हेही आवश्यक झाले आहे. तसेच एआय टूलच्या वापरामुळे कामास गती मिळते मात्र आपत्कालीन स्थितीतही सत्य आणि नैतिकता जपणे आवश्यक आहे, असे मत विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी 'पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे' अधिकृत उदघाटन झाल्याचे प्रवीण टाके यांनी जाहीर केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय)च्या कोल्हापूर चॅप्टर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ.रवींद्र चिंचोलकर, कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष प्रा.डॉ. निशा मुडे-पवार, सचिव विश्वजीत भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.रवींद्र चिंचोलकर म्हणाले, 'जनसंपर्क आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक बनले आहे. जनसंपर्क व माध्यमातील सर्वांनाच प्रॉम्प्ट ट्रेनिंग आवश्यक आहे. एआयचा वापर शिकल्यास नोकऱ्यांची संधी उपलब्ध असेल. पीआरएसआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रात कामाची संधी मिळू शकते.' अंकुश चव्हाण म्हणाले, 'आपत्कालीन स्थितीत पहिले काही तास 'गोल्डन अवर' म्हणून महत्वाचे असतात. यंत्रणेने नेमके काय चुकले ते शोधून दुरुस्ती करणे गरजेचे असते. घटना घडल्यानंतर माध्यमांना तत्काळ योग्य माहिती दिल्यास नंतर खुलासा करण्याची गरज पडत नाही.'

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे माजी विद्यार्थी व भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी वारणा कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, माझगाव डॉकचे माध्यम सल्लागार पी.एस.पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, आकाशवाणी पुणे वृत्त विभागाचे माधव जायभाई, कोल्हापूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र पारिजात, जेष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या डॉ.वृषाली बर्गे, कणेरी मठाचे जनसंपर्क अधिकारी विवेक सिद्ध, तुतारी जाहिरात संस्थेचे संचालक सचिन मोरे, सरदार जाधव, विवेक पोर्लेकर, टिटवे कॉलेजचे दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, डायमंड



हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सुनील भस्मे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनुराधा ईनामदार व डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी केले. कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य, जनसंपर्क, जाहिरात, विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत व्यक्ती तसेच माध्यम क्षेत्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पीआरएसआय 'कोल्हापूर चॅप्टर आणि पत्रकारिता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

2 3 APR 2026

सकाळ

# विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

कोल्हापूर, ता. २२ : शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (ता. २४) सकाळी दहा वाजता 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' या विषयावर परिषद होणार आहे, अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी दिली.

2 3 APR 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

**कोल्हापूर :** शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, शेतीची शाश्वतता आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' या विषयावर एकदिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, स्वयंसहायता बचत गटांच्या महिला, तसेच ग्रामीण विकास क्षेत्रातील घटकांसाठी ही परिषद अत्यंत उपयुक्त ठरेल, अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी दिली.

2 3 APR 2026

सकाळ

**चर्चासत्र :** शिवाजी विद्यापीठ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र. स्थळ : मानव्यशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ.

वेळ : सकाळी अकरा

जनसंपर्क कक्ष
2 3 APR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

जनप्रवास : कोल्हापूर

शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, शेतीची शाश्वतता आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात उद्या "शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी" या विषयावर २४ रोजी एकदिवसीय परिषद आयोजित केली आहे.

शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, स्वयंसहायता बचत गटांच्या महिला तसेच ग्रामीण विकास क्षेत्रातील घटकांसाठी ही परिषद अत्यंत उपयुक्त ठरेल, अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी दिली. या परिषदेत शाश्वत शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पद्धती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पीक पद्धतींचा अवलंब, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जलसंधारणाचे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून मूल्यवर्धन, उत्पादनाचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेतील संधी याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल.

जनसंपर्क कक्ष

2 3 APR 2026 सिंधुदुर्ग समाचार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक कला व वारसा दिनानिमित्त विद्यापीठात 'रंग कुंचल्याचे' स्पर्धा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत नुकताच जागतिक कला दिन (१५ एप्रिल) आणि जागतिक वारसा दिन (१८ एप्रिल) असा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला.

विद्यापीठात या निमित्ताने 'रंग कुंचल्याचे' ही स्पॉट पेंटींग स्पर्धा शनिवारी (दि १८) घेण्यात आली. विशेष म्हणजे या स्पर्धेत हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षकही स्पर्धक म्हणून सहभागी झाले.

स्पर्धेत हिंदी अधिविभागातील शिक्षक विद्यार्थ्यांसह भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनीही सहभाग घेतला. सर्वांनीच स्वतःला रंगांच्या दुनियेत हरवून चित्रकलेचा आनंद घेतला. वि.स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ पार पडलेल्या या स्पर्धेत डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे, प्रतीक्षा ढुंबरे आदींनी सहभाग घेतला तसेच संयोजन केले.

2 3 APR 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

**कोल्हापूर :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती शाश्वत करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ येथे शुक्रवारी ( दि. २४) 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' या विषयावर एकदिवसीय परिषद होणार आहे.

विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सकाळी ११ वाजता परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

या परिषदेत शाश्वत शेतीच्या आधुनिक पद्धती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पीक पद्धती, सेंद्रिय शेती जलसंधारण तसेच कृषी प्रक्रिया उद्योग, उत्पादनाचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेतील संधी याबाबत तज्ज्ञ माहिती देतील. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांद्वारे पूरक व्यवसाय व लघुउद्योगांवर विशेष सत्र होणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला व ग्रामीण घटकांनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. नितीन माळी यांनी केले आहे.

2 3 APR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात २४ एप्रिलला शाश्वत शेती परिषद

**कोल्हापूर,(महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, शेतीची शाश्वतता आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात उद्या शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी या विषयावर एकदिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, स्वयंसहायता बचत गटांच्या महिला तसेच ग्रामीण विकास क्षेत्रातील घटकांसाठी ही परिषद अत्यंत उपयुक्त ठरेल, अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी दिली.

या परिषदेत शाश्वत शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पद्धती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पीक पद्धतींचा अवलंब, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जलसंधारणाचे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून मूल्यवर्धन, उत्पादनाचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेतील संधी याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून पूरक व्यवसाय, लघुउद्योग, घरगुती उत्पादन आणि उद्योजकतेच्या संधी यावर विशेष सत्र आयोजित केले आहे. यामुळे महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी आणि उत्पन्नवाढीसाठी आवश्यक दिशा मिळेल. परिषदेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, कृषी अधिकारी, अनुभवी प्रगतशील शेतकरी मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे सहभागी शेतकरी व महिलांना प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी प्रेरणा मिळेल. तसेच शाश्वत शेतीविषयी जागरूकता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही डॉ. माळी यांनी व्यक्त केला.

2 3 APR 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि. २४ रोजी एकदिवसीय परिषदेचे आयोजन केले असल्याची माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी दिली.

शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, शेतीची शाश्वतता व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' या विषयावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. ही शिवाजी परिषद विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
2 3 APR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे निधन

- शिवाजी विद्यापीठासह शैक्षणिक क्षेत्रात शोककळा
- १२ दिवस मृत्यूशी झुंज व्यर्थ

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीकृष्ण शंकर महाजन (वय ५७) यांचे मंगळवारी पहाटे निधन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या निवडीत त्यांचे नाव आघाडीवर होते. यासाठी नुकतेच मुंबई येथे त्यांनी मुलाखत दिली होती.



डॉ. महाजन हे मॉर्निंग वॉकला गेले असता शेंडा पार्क येथे एका दुचाकीस्वाराने त्यांना पाठीमागून धडक दिली होती. यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. तब्बल १२ दिवस त्यांच्यावर एका खासगी दवाखान्यात उपचार सुरू होते. आज पहाटे उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्यावर बुधवारी दुपारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, नात असा परिवार आहे.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. महादेव देशमुख, डी.जी. भास्कर, डॉ रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, आदींसह फुले–शाहू–आंबेडकर चळवळीतील नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे लेखांकन, वित्त आणि उद्योजकता या विषयांवर विशेष प्रभुत्व होते. डॉ. महाजन यांच्या निधनाने विद्यापीठाची मोठी हानी झाली असल्याच्या भावना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केल्या.

2 3 APR 2026

पुढारी

# डॉ. महाजन यांच्या निधनाने शैक्षणिक, संशोधन क्षेत्राची हानी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लेखांकन, वित्त आणि उद्योजकता या विषयांवर प्रभुत्व असलेल्या डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या निधनाने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कधीही भरुन न येणारी अपरिमित हानी झाली आहे, अशा शब्दात शिवाजी विद्यापीठात शोक व्यक्त करण्यात आला. एक सक्षम नेतृत्व हरपले, अशा भावना व्यक्त करत प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु डॉ. ज्योती जाधव यांच्यासह विद्यापीठातील पदाधिकारी, अधिविभागप्रमुखांनी डॉ. महाजन यांचे अंत्यदर्शन घेतले.

**● शिवाजी विद्यापीठावर शोककळा, सक्षम नेतृत्व हरपले अशा शब्दात श्रद्धांजली**

डॉ. महाजन यांनी आपले पदव्युत्तर तसेच पीएच.डी.चे शिक्षण शिवाजी विद्यापीठातूनच पूर्ण केले. आर्थिक समावेशन आणि उद्योजकीय वित्त या विषयांवरील संशोधन प्रकल्पांवर त्यांनी काम केले. निर्गुंतवणूक, वित्त व व्यवस्थापन, आर्थिक समावेशन इत्यादी विविध वाणिज्यिक संशोधनपर विषयांवर प्रसिद्ध झालेले आणि विविध परिषदांत सादर केलेल्या शोधनिबंधांची संख्या दीडशेहून अधिक आहे. त्यांची अनेक पुस्तकेही प्रकाशित आहेत.

“

डॉ. महाजन यांनी विद्यापीठास मोलाचे शैक्षणिक व संशोधकीय योगदान दिले. विविध महत्त्वाच्या पदांवर आणि समित्यांवर काम करीत असताना प्रशासकीय पातळीवरही त्यांनी बजावलेली कामगिरी अविस्मरणीय ठरली.

**- कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी**

विद्यापीठाचे विद्यार्थी ते अधिष्ठाता असा त्यांचा प्रवास झाला. ते एक विद्वान प्राध्यापक होतेच, पण सहृदय माणूसही होते. शांत, सुस्वभावी सहकारी गमावल्याचे दुःख आहे.

**प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव**

जनसंपर्क कक्ष
2 3 APR 2026
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे निधन

## अपघातानंतर बारा दिवसांची झुंज संपली; शैक्षणिक क्षेत्रात हळहळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीकृष्ण महाजन (वय ५७) यांचे बुधवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून आणि नात असा परिवार आहे.

१० एप्रिल रोजी सकाळी फिरण्यासाठी गेले असताना एका दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली होती. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. गेले १२ दिवस ते मृत्यूशी झुंज देत होते. अखेर खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान बुधवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. पंचगंगा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

2 3 APR 2026

लोकमत

# श्रीकृष्ण महाजन यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख तथा वरिष्ठ प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण शंकर महाजन (वय ५७) यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, नात असा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवारी (दि. २५) आहे.



दहा एप्रिलला सकाळी ते शेंडा पार्क परिसरात फिरायला गेले असताना, एका दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली होती. यात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. बुधवारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मूळचे इचलकरंजीचे असलेल्या डॉ. महाजन यांनी काही काळ कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक, तसेच सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक म्हणूनही ते काम पाहत होते.

> “
> डॉ. महाजन यांनी विद्यापीठास शैक्षणिक व संशोधकीय योगदान दिले. विद्यापीठाचे विद्यार्थी ते अधिष्ठाता असा त्यांचा प्रवास झाला. ते एक विद्वान प्राध्यापक होतेच, पण सहृदय माणूसही होते.
>
> **डॉ. सुरेश गोसावी**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

2 3 APR 2026

जनप्रवास

# व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे निधन

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीकृष्ण तथा एस.एस. महाजन यांचे बुधवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठाची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत. तर डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या निधनामुळे शांत, सुस्वभावी आणि विद्वान सहकारी अकाली गमावल्याचे मोठे दुःख वाटत आहे, अशा शोकभावना शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केल्या आहेत.

डॉ. श्रीकृष्ण शंकर महाजन (जन्म १८ नोव्हेंबर १९६९; मृत्यू २२ एप्रिल २०२६) हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख तथा वरिष्ठ प्राध्यापक होते. लेखांकन, वित्त आणि उद्योजकता या विषयांवर त्यांचे विशेष प्रभुत्व राहिले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांनी निर्गुंतवणूक, उद्योजकीय वित्त आणि वित्तीय



समावेशन यांसारख्या विषयांवर संशोधन केले. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तसेच सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक म्हणूनही त्यांनी प्रभावी काम केले. अनेक महत्त्वपूर्ण पुस्तके प्रकाशित केली.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ वर्षा मैंदर्गी, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. हरीश भालेराव, डॉ. रवींद्र श्रावस्ती, डॉ. श्यामसुंदर मिरजकर, डी.जी. भास्कर, डॉ रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, प्रभंजन माने, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते. डॉ. महाजन यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, सून आणि नात असा परिवार आहे.

2 3 APR 2026

सकाळ

# डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे निधन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण शंकर तथा एस. एस. महाजन (वय ५७, रा. वर्षानगर) यांचे आज निधन झाले.

लेखांकन, वित्त आणि उद्योजकता हे त्यांच्या अभ्यास व संशोधनाचे विषय होते. वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सून, नात असा परिवार आहे.

दीड आठवड्यांपूर्वी डॉ. महाजन सकाळी फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी एका दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिल्याने ते जखमी झाले. त्यांच्यावर खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पंचगंगा



डॉ. श्रीकृष्ण महाजन

स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मूळचे इचलकरंजी येथील असणारे डॉ. महाजन यांनी शैक्षणिक क्षेत्रातील कारकीर्द डीआरके कॉमर्स कॉलेजमधून प्राध्यापक म्हणून सुरू केली. पुढे ते विद्यापीठात वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख तथा वरिष्ठ प्राध्यापक म्हणून रुजू झाले. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक आणि सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक म्हणूनही त्यांनी प्रभावी काम केले. त्यांची अनेक पुस्तकेही प्रकाशित आहेत. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी उद्या, गुरुवारी दुपारी तीन वाजता विद्यापीठात शोकसभा होणार आहे.

2 3 APR 2026

लोकमत

# प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे निधन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन (वय ५७) यांचे बुधवारी निधन झाले. लेखांकन, वित्त आणि उद्योजकता या विषयांवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. बारा दिवसांपूर्वी डॉ. महाजन हे सकाळी फिरण्यासाठी गेले होते. एका दुचाकीस्वाराने त्यांना जोरदार धडक दिली होती. त्यानंतर त्यांच्यावर येथील खासगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. आज त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, नात असा परिवार आहे.

डॉ. महाजन यांनी प्रारंभी कोल्हापुरातील कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काही काळ काम केले. त्यानंतर ते शिवाजी विद्यापीठात वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख तथा वरिष्ठ प्राध्यापक होते.